प्रथम मान्यता

Recognition Certificate.

शिक्षणाधिकारी (प्राथ) जि.प.नाशिक
जा.क्र..शि/प्राथ८/१२८७/२०१९
नाशिक दिनांक १४/ ६ /२०१९

प्रति,

अध्यक्ष/सचिव
मलंकारा सिरियन कॅथोलिक ट्रस्ट,
मारीया नगर,पाडी,,चेन्नई (ताकमळनाडू)

विषय:- सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणे करीता परवानगी देऊन प्रथम मान्यता देणेबाबत.

संदर्भ:- १) महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक १९ जानेवारी २०१३ , दिनांक २ जुलै २०१३ व दिनांक २१ ऑगस्ट २०१३
२) महाराष्ट्र शासनाचे शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचा शासन निर्णय.क्र. एसएफएस-१०१७/प्र.क्र.७०१/एसएम-२ दि.३१ जुलै २०१९
३) मा.शिक्षण उपसंचालक,नाशि/प्राथ-२/स्वअसरा/नवीन/२०१९/२८८०६/०८ दि. १३/८/२०१९

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविणेत येते की, आपल्या संस्थेने महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये नवीन शाळा स्थापन करणे करिता/ विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता प्रस्ताव सादर केला होता त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र. २ ते ३ च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणेकरीता विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरीता खालील अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.

संदर्भ. क्र.३ अन्वये मा.शिक्षण उपसंचालक नासिक विभाग नासिक यांचेकडुन नवीन शाळा स्थापन करणे/ विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरीता परवानगी देण्यात आली आहे.मा.शिक्षण संचालक (प्राथमिक) म.रा.पुणे-१ यांनी प्रथम मान्यता देणेबाबतची कार्यवाही करणेबाबत सुचित केलेले आहे संस्थेने खालील अटी शर्तीची पुर्तता करणेचे अटींवर प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| शासन मंजुर क्रमांक | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नांव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नांव पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग /इयत्ता | मान्यता वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नासिक | मलंकारा सिरियन कॅथोलिक ट्रस्ट,मारीयानगर,पाडी, चेन्नई (तामिळनाडू) | सेंट थॉमस मलंकारा कॅथोलिक स्कूल,वासाळी,ता.जि. नाशिक | इंग्रजी (सीबीएसई) | नवीन शाळा | इयत्ता १ ली ते १२ वी | २०१९-२० |

अटी व शर्ती

१) संस्थेने शाळा परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादीमध्ये भविष्यात बदल करता येणार नाही
२) शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
३) या अधिनियमातील तरतुदीनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासुन असेल
४) शैक्षणिक वर्ष सन २०१८-१९ मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे त्या वर्गाव्यतिरिक्त इतर वर्ग चालु करता येणार नाहीत.
५) परवानगी मिळाल्या पासुन अठरा महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी आपोआप रद्द बाबत ठरेल
६) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमीत होणाऱ्या आदेशाचे कार्यपध्दतीचे तसेच बालकांचामोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) मुख्या अधिनियम २०१३ मधील सर्व तरतुदीचे पालन करणे बंधनकारक राहिल.
७) शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहितीकरीता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र नवीनशाळा/वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.
८) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळेचे भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

९) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित शाळा/वर्ग म्हणुन स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील

१०) शासनाने सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहित करेल अशा नियमांची अंमलबजावणी करणे संस्थेला बंधनकारक राहिल.

११) महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ च्या पोटनियम (४) ११ मानके पुर्ण करणे आवश्यक आहे.

१२) शासन निर्णय दिनांक १३ डिसेंबर २०१३ नुसार संच निश्चीती करुन घेणे आवश्यक आहे.

१३) प्रचलित नियम व निकषानुसार शिक्षक नियुक्ती करावी/टिईटी पात्र शिक्षकांची नियुक्तीसाठी योग्य ती कार्यवाही करावी.

१४) संस्था व्यवस्थापन व शिक्षणाधिकारी (प्राथ) जि.प.नासिक यांचे संयुक्त नावे राष्ट्रीयकृत बॅकेत तीन वर्ष कालावधी साटी मुदतठेव ठेवणे आवश्यक आहे.

14.8.19

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद नासिक

प्रत:- माहितीसाठी सविनय सादर.

१) मा.शिक्षण उपसंचालक नासिक विभाग नासिक .

२) मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे-१

३) मा.शिक्षण संचालक (प्राथमिक) शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे.

४) गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती नाशिक ता. नाशिक जि.नासिक